


# शाकीर तांबोळी

प्रदेश उपाध्यक्ष, अल्पसंख्यांक विभाग

राष्ट्रीय काँग्रेस पार्टी, महाराष्ट्र प्रदेश


---

दि.

दि.१५/७/२०२४

जा.क२२२/२०२४-२५

J.A.Lohar 15/07/24

आवक लिपीक

जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

(समक्ष मा. जिल्हाधिकारीसो यांचेकडे)

प्रति,

मा. जिल्हाधिकारीसो

सांगली जिल्हा

विषय-- दि.१४/७/२०२४ रोजी विशाळगड व गजापूर जि. कोल्हापूर येथे घडलेल्या दंगलीतील दोषींना व मास्टरमाइंड वर करवाई करणेबाबत,

महोदय

उपरोक्त विषयास अनुसरून राज्यातील हिंदू मुस्लिम एकोप्यास सुरूंग लावण्याच्या उद्देशाने हिंदू मुस्लिम जातीय दंगली घडवून राष्ट्रद्रोह करणाऱ्या प्रवृत्तीने विशाळगडावरील न्यायप्रविष्ट असणाऱ्या अतिक्रमणाच्या विषयाचे निमित्त पूढे करीत इतिहासकालीन,प्राचीन असणाऱ्या पीर मलिक रेहान बाबा यांच्या दर्गाहची नासधूस करत विशाळगड व गजापूर येथील निष्पाप मुस्लिमांना जिवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. हे निश्चितच गंभीर असून सदर विषयी आम्ही आपल्याकडे पुढील काही मुद्दे प्रस्तूत करत संबधित दोंषीच्यावर भारतीय दंड संहिता कलम ११७(४),१९२,२९५,२९७,२९८,३००,व ३०१ अन्वये गुन्हे दाखल करावेत. हे नम्र निवेदन

1)पीर मलिक रेहान दर्गाह परिसरातील सीसीटीव्हीचे फुटेज तपासून दोषी दंगलखोर हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांची ओळख पटवून तात्काळ गुन्हे दाखल होऊन कठोर कारवाई करावी.

2) विशाळगड अतिक्रमण आणि दर्गा मशिदीचा काही संबंध नसताना दर्ग्यावर आणि मशिदीवर दगडफेक करणारे,पोलिसांवर हल्ले करणारे,मुस्लिम लोकांवर आणि त्यांच्या घरावर दगडफेक करणाऱ्या हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांवर कडक कायदेशीर कारवाई करावी.

3) पोलिसांना हल्ल्याची पूर्वकल्पना असतानाही दर्गा आणि मुस्लिम वस्त्यांना पुरेशी संरक्षण न पुरवल्याने व तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यास वारंवार अपयशी ठरणाऱ्या कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक व पोलीस अधीक्षक यांची तत्काळ बदली व्हावी.

---


ऑफीस : वाळवेकर कॉम्प्लेक्स समोर, काळा मारुती चौक, इस्लामपूर. (४१५ ४०९) जि.सांगली. ७०२८८२८४४४

Email: shakirtamboli@gmail.com

4) गजापूर आणि विशाळगड अतिक्रमण याचा काहीही संबंध नसताना हिंदुत्ववाद्यांनी मुस्लिम द्वेषातून गजापूर मधील मशीद, मुस्लिमांची घरे , गाड्यांची,मालमत्त्यांची नासधूस करून त्यांना आग लावली आहे त्यांचे पंचनामे करून त्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी

5) विशाळगड दर्गाह येथे कायमस्वरूपी एसआरपीएफ पोलिसांची नेमणूक करावी.

6) सदर दंगलीस कारणीभूत असणारे नितीन शिंदे व रवींद्र पडवळ व त्यांच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करून त्यांना तात्काळ अटक करावी.

7) समाज माध्यमावर जे जे हिंदुत्ववादी हजार वर्षांपूर्वीच्या विशाळगड दर्ग्याबाबत गैरसमज आणि मुस्लिम द्वेष भडकाऊ रील्स तयार करून प्रसारित केलेले आहेत त्या दोषीवर गुन्हे दाखल होऊन कडक कारवाई व्हावी.

तरी सदर विषयीचे आपण गांभीर्याने नोंद घ्यावी व जिल्ह्यातील पर्यायाने महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कार्य करावे,कळावे

शाकीर तांबोळी

प्रत-१) मा.एकनाथजी शिंदे ,मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

२) मा शंभूराजे देसाई ,गृह राज्यमंत्री,महाराष्ट्र राज्य

३) मा हसन मुश्रीफ साहेब ,पालकमंत्री कोल्हापूर जिल्हा

४) मा.अल्पसंख्याक आयोग, मुबंई

५) मा जिल्हाधिकारी कोल्हापूर